स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत सामाजिकशास्त्रेविद्याशाखेअंतर्गतराज्यशास्त्रविषयातील

पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणारा प्रबंधाचा लघुआराखडा

विषय : राज्यशास्त्र

***** संशोधन विषय *****

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जातीनिर्मुलनविषयक विचार : एक अभ्यास

*** संशोधक***

नामदेव तुकाराम काटकांबळे

(एम.ए.,सेट)

मो.नं ९८२२६८०७३८, ८४८२८८८५५३,

E-mail ID :katkamble.natu@rediffmail.com

Category: S.C.

*** मार्गदर्शक***

प्रा.डॉ.प्रताप वामनराव पाटील

(एम.ए.,बी.एड.,एम.फिल.,पीएच.डी.)

विभाग प्रमुख,राज्यशास्त्र विभाग,

हु. बहिर्जी स्मारक महाविदयालय,वसमत ता.वसमत जि.हिंगोली ४३१५१२

मो.न ८६२४९२८१८७, ९४२३३४६०३३, E-mail ID :drpatilpratap@gmail.com

*** संशोधन केंद्र***

राज्यशास्त्र विभाग

पिपल्स कॉलेज नांदेड

*** सन फेब्रुवारी २०१५–१६***

❖ प्रस्तावना :—

पृथ्वीतलावरील सर्व मानव समान आहेत. प्रदेश, धर्म, जात, भाषा, लिंग या आधारावर व्यक्ती व्यक्तीमध्ये भेदभाव करू नये. हा खऱ्या अर्थाने मानवतावादी विचार आहे.मानव धर्म हाच खरा धर्म आहे. भारतीय समाज व्यवस्था पुरूषप्रधान आणि जातींवर आधारीत आहे.प्राचीन काळापासून म. गौतम बुध्द, रामानुज,संत कबीर यांनी जातीव्यवस्थेविरोधात कार्य केले आहे.समाजसुधारकांच्या दिडशे वर्षांच्या प्रयत्नानंतरही जात ही संकल्पना समाजातून हद्दपार होवू शकली नाही.भारतात लोकशाही स्वीकारून ६६ वर्षे होत आहेत तरी सुध्दा अनिष्ठ जातीप्रथा टिकून आहेत. जातींच्या आधारावर माणसामाणसात भेदभाव केला जातो.भारतीय संविधानात स्वातंत्र,समता,बंधुता,न्याय,धर्मनिरपेक्षता,वैज्ञानिक दृष्टीकोण या विचारांचा पुरस्कार केला आहे.

संविधानाचा उद्देश समानतेवर आधारीत समाजाची निर्मिती करणे हा आहे. भारतात जातींचा अंत झालेला नाही. स्वातंत्र्यानंतर अनेक धार्मिक व जाती दंगली झालेल्या आहेत. समाजकारणात व राजकारणात जातींचे अस्तित्व टिकूण आहे.जातीव्यवस्थेमुळे आपल्या देशांचे हजारों वर्षांपासून आर्थिक, राजकीय, सामाजिक व मानसिक नुकसान झालेले आहे. राज्यघटनेतील समतावादी विचारांचा प्रसार करण्यासाठी सरकार व समाजाने पुढाकार घेणे ही सध्या काळाची गरज आहे.छ.शिवाजी महाराज,म. फुले,राजर्षी छ.शाहू महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जाती निर्मूलनासाठी कार्ये केले आहे.जातीअंताचा वा निर्मुलनाचा विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकर व म.फुले यांनी प्रकर्षाने मांडला. परंतु या सुधारकांनाच आज जातीच्या कुंपणात बंदिस्त करण्याचे प्रयत्न चालले आहेत. आजचे राजकारण, समाजकारण व धर्मकारण ही जातींच्या जळमटाने व्यापले गेले आहे. **भारतातील जाती,शुद्र पूर्वी कोण होते? जाती निर्मूलन,अस्पृश्यता,बुध्द आणि त्यांचा धम्म,रिडल्स इन हिंदुझम इ. ग्रंथात, लेखनात व अनेक भाषणांत डॉ.आंबेडकर यांनी धर्मविषयक व जातीविषयक विचार मांडलेले आहेत.**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जातीविहीन समाजाचे स्वप्न पाहिले होते.परंतु आजचे देशातील चित्र नेमके त्याच्या विरूध्द दिसून येते. जातींच्या, धर्मांच्या आधारावर भेदभाव केला जात आहे.जात ही एक मानसिक भावना आहे.अनेक कायदे मंजूर केले असले तरी व्यक्तींच्या मनातून जात गेलेली नाही.लोकशाहीत जातींमुळे समतेऐवजी विषमता वाढत आहे.शासन, कोणताही धर्म व राजकीय पक्ष जातीव्यवस्था संपावी म्हणून प्रयत्न करताना दिसत नाही.राजकारणात सत्तेसाठी धर्म व जातींचा वापर करून समाजात फुट पाडण्याचे काम अनेक राजकीय पक्ष करत आहेत.**ज्येष्ठ विचारवंत कॉ.शरद पाटील यांच्या मते,'या देशातील सर्वच धर्म, राजकीय पक्ष आणि भांडवलदार जातीव्यवस्थेचे गुलाम आहेत. त्यांना कोणालाच जातीव्यवस्था नष्ट करावी असे वाटत नाही.'** स्वातंत्र्याच्या सहा दशकानंतर सुध्दा शासन व राजकीय पक्षांकडे जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी प्रभावी कार्यक्रम नाही.विषमतावादयांनी समतावादी विचार दडपण्याचा प्रयत्न केला आहे.आंतरराष्ट्रीय पातळीवर सुध्दा पंथाच्या

नावाने स्वतंत्र देश निर्माण करण्याचा प्रयत्न मूलतत्ववादी दहशतवादी संघटना करत आहेत. यासर्व भीषण वास्तव परिस्थितीमध्ये डॉ. आंबेडकरांच्या धर्मविषयक व जातीनिर्मूलन विषयक विचारांची आज भारतालाच नव्हे तर जगाला आवश्यकता आहे. आज भारतात कमीतकमी चार ते पाच हजार जाती आहेत. याजातींमध्ये पोटजाती तर हजारोंनी आहेत. जातींना धार्मिक बैठक असते.भारतीयांच्या मनातून जात अजूनही गेलेली नाही. भारत देश जातीमुक्त झाला तरच ख—या अर्थाने आपला देश महासत्ता होवू शकतो.

❖ **ऐतिहासिक पार्श्वभूमी :—**

जगातील इतर समाजाप्रमाणेच भारतीय समाज ही सुरूवातीच्या काळात अनेक वर्गांनी मिळून बनलेला होता. भारतात प्राचीन काळी पुढील वर्ग होते —

१.ब्राम्हण किंवा उपाध्याय वर्ग

२.क्षत्रिय किंवा सैनिक वर्ग

३.वैश्य किंवा व्यापारी

४.शुद्र किंवा शेतकरी व मजूरांचा वर्ग

श्रमविभागणीच्या तत्वानुसार बाकींच्या जनतेचीही विभागणी झाली. या पध्दतीत व्यक्तींनी पात्रता मिळविण्यानंतर त्याला वर्ग बदलता येवू शकत होता व त्यामुळे वर्गातील व्यक्ती बदलत राहत असत. त्यामुळे आजच्या अनेक जातींच्या उगमाचा हा वर्ग मूळसाठा ठरला. जाती नेहमीच केवळ अनेकवचनी रूपातच अस्तित्वात असतात. ब्राम्हण वर्गाने स्वत:ला त्यांनी ब्राम्हणाची एक जात निर्माण केली. अब्राम्हण वर्गाने अनुकरण केले. मनुच्या फार पूर्वी जाती अस्तित्वात होत्या. तो जातीप्रथेचा एक प्रचारक होता. प्राचीन काळी गटबाहय विवाहांची पध्दती रूढ होती. नंतर काळाच्या ओघात गटबाहय विवाहाची रूढी मागे पडून गटांतर्गत विवाह ही पध्दती रूढझाली.

गटबाहय विवाह करणा—या समाजामध्ये गटांतर्गत विवाह करण्याची रूढी कशी कार्यरत झाली म्हणजेच जाती कशा निर्माण झाल्या हा एक गंभीर प्रश्न आहे.

पाश्चात्य पंडितांच्या मते ज्या केंद्रबिंदु भोवती जाती निर्माण झाल्या ते असे —

१.धंदा

२.वर्गीय संस्थांचे अवशेष

३.नव्या श्रध्देचा उदय

४ मिश्र जातीय संतती

५. देशांतर

❖ **अभ्यास विषयाचे महत्व :—**

खाजगीकरण, उदारीकरण व जागतीकीकरणाच्या तसेच माहिती तंत्रज्ञानाच्या युगात जातींचे मेळावे होत आहेत. जातींचे उदात्तीकरण होत आहे. सर्वच सामाजीक व राजकीय संघटना जातींचे राजकारण करत आहेत. राष्ट्रवादाच्या उभारणीत जातीयवाद एक मोठा अडथळा बनला आहे. प्रत्येक जात दुसऱ्या जातीचा व्देष करते. विवाह जाती व पोटजातीमध्येच होत आहेत. त्यामुळे जाती अजूनही मजबूत होत आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अमेरीकेतील कोलंबीया विद्यापीठात **भारतातील जाती** या शोधनिबंधाचे चर्चासत्रात वाचन केले होते. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लाहोर येथील **जातपाततोडक मंडळाच्या वार्षीक संमेलनात अध्यक्षीय भाषण** देण्यासाठी Annihilation of caste (जातींचे उच्चाटन) या नावाने लिहीलेला प्रबंध १९३६ मध्ये प्रकाशित केला. या घटनेला ८० वर्षी होत आहेत. तसेच राज्यघटनेच्या अमलबजावणीलाही ६५ वर्षे पुर्ण होत असतानाही राज्यघटनेतील सामाजीक समता अस्तित्वात आलेली नाही. जातीव्यवस्था अजूनही घट्ट झालेली आहे. जातींमुळे समाजाची विभागणी अनेक समुहांमध्ये झालेली आहे. आजही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जातीनिर्मूलनाविषयी विचारांची देशाला गरज आहे. जातींचे उच्चाटन झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने भातीय समाज एकसंघ राहु शकत नाही. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय यावर आधारीत समाजाची निर्मीती करणे हाच भारतीय संविधानाचा उद्देश आहे.**'भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.'**ही प्रतिज्ञा प्रत्येक भारतीयाच्या मनात रूजली तरच भारतीय लोकशाही मजबूत व यशस्वी होईल.

हिंदू धर्मातील अनेक अनिष्ठ प्रथांविरूध्द समाजसुधारकांनी काम केलेले आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते जातीभेद हा हिंदु धर्मावरील कलंक आहे. भारत हा विषमतेचे माहेरघर बनला आहे. हिंदु समाज जातीविरहीत होवून संघटित झाला तरच सामाजिक समता अस्तित्वात येवून राष्ट्रीय ऐक्य निर्माण होईल. राष्ट्रवाद निर्माण होण्यासाठी भारतातील जातींचे उच्चाटन झाले पाहिजे. अनेक संतांनी व समाजसुधारकांनी शेकडो वर्षे प्रयत्न करूनही जातीयता आजही कायम आहे.जातींचा वापर राजकारणात होत आहे. म्हणून या अभ्यासविषयाचे महत्व अनन्यसाधारण आहे. एका बाजुला राष्ट्रपुरूषांच्या नावांचा जयजयकार करणे व दुस—या बाजुला धर्म व जातीवरून समाजात भेदभाव करणे हे दुटप्पीपणाचे आहे. राज्यघटनेच्या अंमलबजावणीला सहा दशकाहुन अधिक काळ लोटला आहे. तरीही जातीजातील दरी कायम आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. असे असले तरी उच्चशिक्षित वर्गही जातीयतेच्या भिंती तोडू शकला नाही.

राजकीय विचारप्रणाली आणि सामाजिक सुधारणा या दृष्टीने अभ्यास करताना डॉ.आंबेडकरांच्याधार्मिक विचारांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. **हिंदु समाजाच्या पुर्नरचनेसाठी जातींचे उच्चाटण झाले पाहिजे.**हिंदु

समाजातील जातींचा संसर्ग भारतातील मुस्लीम व शिख समाजात झालेला आहे. जातींचे उच्चाटण करणे हा डॉ. आंबेडकरांचा ध्यास होता. त्यांनी समाजरचनेची सैध्दांतिक मांडणी सांगितलेली आहे. त्यांच्या मते आर्थिक, धार्मिक आणि राजकीय असे समाजरचनेचे तीन प्रकार असतात. त्यांच्या परस्पर संबंधातून समाजरचना निर्माण होते.जातीविरहीत समाजरचना अस्तित्वात येण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी अनेक ग्रंथ लेखनातुन धर्मचिंतनाचे, समाज सुधारणेचे विचार मांडलेले आहेत. डॉ.आंबेडकरांचा आयुष्यात मुख्य रस होता जातीप्रथेच्या प्रश्नावर. ही दुष्ट प्रथा नष्ट करण्यासाठी आयुष्य वाहून घेणे हे त्यांनी आपल्या आयुष्याचे ध्येय ठरविले होते. राष्ट्रीय ऐक्यासाठी जातींचे उच्चाटन करणे आवश्यक आहे. त्यामुळे डॉ.आंबेडकरांच्या धर्म व जातीनिर्मुलन विषयक विचारांचा व कार्यांचा अभ्यास या प्रस्तावित संशोधनात करण्यात येणार आहे.

व्याख्या :–**डॉ.बाबासाहेब आंबेडकर**

१. जात म्हणजे एक मोठया सांस्कृतिक ऐक्य असलेल्या समाजाचा एक अंशात्मक तुकडा आहे.

२. जातीभेद व्यवस्था ही एकाच वंशाच्या लोकांची सामाजिक विभागणी आहे. जात ही एक मानसिक भावना आहे.

मि.सेनार्ट या फ्रेंच विदवानाने जातीची खालील लक्षणे सांगितली आहेत

१. जात ही आनुवंशिकतेच्या बंधनांनी बांधलेली एक घनिष्ट संस्था आहे.

२. जातीत जातपंचायती असतात.

३. जात एका विशिष्ट धंदयाशी निगडित असते.

४. जातितील लोक जातीतच रोटी–बेटी व्यवहार करतात.

❖ **विषय निवड :–**

१. **छ.शिवाजी महाराजांचे आज्ञापत्रातून**– एकांस दु:ख देऊन जें कार्य करीन म्हणेल, ते कार्य करणारास हित स्वल्पकाळेंच बुडोन नाहींसेच होतें.

२. **राजर्षी छ.शाहूमहाराज**– या देशाची उन्नती लवकर वा उशिरा होणे, हे येथील जातिभेद ज्या प्रमाणात नाहीसा होईल, त्यावर अवलंबून आहे. जातीभेद मोडण्याचे काम उच्च म्हणविणा–या लोकांकडून प्रथम झाल्यास हे स्वार्थत्यागाचे उदाहरण इतर सर्व जातींना बोधप्रद होईल. असे झाले म्हणजे सुरळितपणे व सलोख्याने जातीभेद मोडण्याचे बिकट काम सिध्दीस जाण्याचा संभव आहे.

३. **डॉ.बाबासाहेब आंबेडकर**–यांच्या मते जातीसंस्थेचे निर्मुलन करण्यासाठी आपल्याला समाजात आमुलाग्र बदल करावे लागेल, कारण जात जीवनाला व्यापून टाकणारी मानसिक अवस्था

आहे. ही मानसिकता आमूलाग्र बदलणे हे सोपे नाही, पण ते केल्याशिवाय आणि सामाजिक विषमतेचे निर्मुलन केल्याशिवाय भारत देश कधीही प्रगती करू शकणार नाही.

देशात सामाजिक समता स्थापित झाली तरच देशाचा विकास होवू शकेल.व्यवहारश: आणि तत्वश: दोन्ही दृष्टीने जातीची समस्या अतिशय व्यापक आहे. जोपर्यंत सामाजिक सलोखा व बंधुभाव निर्माण होणार नाही आणि जोपर्यंत सामाजिक समता स्थापित होणार नाही तोपर्यंत ख—या अर्थाने सामाजिक, शैक्षणिव व आर्थिक विकास साधने शक्य नाही. यासाठी जातीभेदांचे निर्मुलन व्हावे. जातींचे निर्मुलन करावे लागेल.यासाठी सर्व समाजातील लोकांची प्रबोधन होण्याची नितांत गरज आहे. त्यामुळे सदर विषयाची निवड केलेली आहे.

❖ अभ्यास विषयाची उद्दिष्टये :—

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जातीनिर्मुलन विषयक विचारांचा व कार्यांचाअभ्यास करणे.

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या समाजरचनेविषयीच्या विचारांचा अभ्यास करणे.

३. भारतातील जातीभेदांमुळे निर्माण होणा—या समस्यांचा अभ्यास करणे.

४. भारतातील जातींच्या उच्चाटणासाठी उपाययोजना सुचविणे.

❖ अभ्यास विषयाची गृहितके :—

१. भारतात मोठया प्रमाणात आजही जातीभेदांची समस्या आहे.

२. शासनाकडे जातीनिर्मुलनासाठी प्रभावी कार्यक्रम नाही.

३. जातींचे मूळ धर्म, परंपरा अनुकरण यात आहे.

४. भारतात जातीनिर्मुलन विषयक कार्यक्रमामुळे अंशत: जागृती निर्माण होत आहे.

❖ अभ्यास विषयाची संशोधन पध्दती :—

डॉ.आंबेडकरांच्या जातीनिर्मुलन विषयक विचारांचा अभ्यास करण्यासाठी संशोधक पुढील दुय्यम साधन सामग्रीचा तथ्य संकलनासाठी उपयोग करणार आहेत.

❖ दुय्यम तथ्य संकलन :—

प्रस्तुत विषयाच्या तथ्य संकलनासाठी डॉ.आंबेडकर यांचे धर्मविषयक व जातीनिर्मुलन विषयक विचार व कार्य यासंबंधीचे साहित्ययांचा चिकित्सक पध्दतीने राजकीय अभ्यास करण्यात येणार आहे. यासाठी संदर्भग्रंथ, प्रबंध, शोधनिबंध, मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट इ. मधून माहितीचे संकलन करून विश्लेषण करण्यात येणार आहे.

❖ **अभ्यास विषयाची व्याप्ती व मर्यादा :—**

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्म, जाती आणि समाजरचना याबाबत विचार व कार्य हे सदर विषयाची व्याप्ती आहे.
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्रीमुक्ती विषयक विचारांचाही अभ्यास केला जाणार आहे.
३. जातींच्या निर्मितीचा, जातींच्या समस्यांचा व जातींच्या उच्चाटणाविषयी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कार्यांचा अभ्यास करण्यात येईल
४. जातीभेद समस्येचा राजकीय दृष्टीकोनातून अभ्यास करण्यात येईल.

❖ **प्रकरणानुसार मांडणी:—**

१.० ऐतिहासिक पार्श्वभूमी
- १.१ प्रास्ताविक
- १.२ संकल्पना/ व्याख्या
- १.३ ऐतिहासिक पार्श्वभूमी
- १.४ समस्या
- १.५ प्राचीन काळातील जातिनिर्मुलन चळवळी
- १.६ मध्ययुगीन काळातील जातिनिर्मुलन चळवळी
- १.७ आधुनिक काळातीलजातिनिर्मुलन चळवळी
- १.८ स्वातंत्र्योत्तर भारतातील जातीनिर्मुलन चळवळी

२.० **संशोधन पध्दती व गतकालीन संदर्भ साहित्याचा आढावा**
- २.१ प्रास्ताविक
- २.२ अभ्यास विषयाची निवड
- २.३ महत्व
- २.४ संशोधन पध्दती
- २.५ नमुना निवड — दुयम तथ्य संकलन
- २.६ अभ्यास विषयाची व्याप्ती व मर्यादा
- २.७ गतकालीन संदर्भ साहित्याचा आढावा

३.० **डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जाती निर्मुलनाविषयी विचार**
- ३.१ भारतातील जातीसंस्था, तिची यंत्रणा, उत्पत्ती आणि विकास
- ३.२ भारतातील जातीसंस्थेचा ऐतिहासिक,सामाजिक,राजकीय व आर्थिक दृष्टीकोणातून अभ्यास
- ३.३ जाती निर्मुलनाविषयी डॉ.बाबासाहेब यांचे विचार व कार्ये

४.० **स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारणात जातींची समस्या आणि भुमीका**
- ४.१ भारतीय राजकारणात जातींचा वापर
- ४.२ भारतीय राजकारणात जातींची भुमीका
- ४.३ भारतातील जातीभेद समस्या व मानवी हक्कांचे उल्लंघन

५.० **संकलीत माहितीचे विश्लेषण**

६.० **सारांश,निष्कर्ष व उपाययोजना**

भविष्यात आवश्यकतेनूसार प्रकरण मांडणीत बदल होवू शकतात.

संदर्भ ग्रंथ सूची :—

१. प्रा. प्रदीप आगलावे — संशोधन पध्दती व तंत्रे , विदयाप्रकाशन नागपूर

२. प्रा.गुरूनाथ नागमोडे — सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन,कोल्हापूर

३. प्रा.ज.भा.बो—हाडे — सामाजिक संशोधन पध्दती, सक्सेस पब्लिकेशन,पुणे

४. प्रा.दादासाहेब काचोळे — सामाजिक संशोधन पध्दती,

५. डॉ.बाबासाहेब आंबेडकर — जातीभेद निर्मुलन

६. डॉ.बाबासाहेब आंबेडकर —भारतातील जाती

७. डॉ.बाबासाहेब आंबेडकर —अस्पृश्यता

८. डॉ.बाबासाहेब आंबेडकर —शुद्र पूर्वी कोण होते ?

९. डॉ.बाबासाहेब आंबेडकर —बुध्द आणि त्यांचा धम्म

१०.डॉ.बाबासाहेब आंबेडकर —रिडल्स इन हिंदुझम

११.डॉ.धनंजय कीर — डॉ.बाबासाहेब आंबेडकर

१२.डॉ.नरेंद्र जाधव — डॉ.आंबेडकरांची भाषणे

१३.डॉ.आंबेडकरांचे लेखन व भाषणे

१४.डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ

१५.स्टेटस ॲण्ड मायनॉरिटी

१६.हिंदु कोड बील

१७.शासनाचे विविध अहवाल

१८. संत कबीर जिवन व कार्य

१९. चार्वक जिवन व कार्य

२०.Prof.Kothari C.R.- Research Methodology methods and technical new edge,Publication New delhi

२१.Google.com

मार्गदर्शक	संशोधक
प्रा.डॉ.पाटील प्रताप वामनराव	काटकांबळे नामदेव तुकाराम